**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : शानावि-१०२६/प्र.क्र.२३/प्रशासन-५.
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३०

वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक-: २४ जुलै,२०२६.

प्रति,

अवर सचिव,
संगणक कक्ष, वित्त विभाग,
३ रा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय -: शासकीय वाहन क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) या वाहनाच्या विक्रीची जाहिरात.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, या विभागातील शासकीय वाहन क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) या वाहनाच्या विक्रीची निविदा जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची असून सदर निविदा जाहिरात दिनांक २७ जुलै, २०२६ रोजी प्रकाशित करावी, ही विनंती. निविदा सूचना व निविदा संदर्भात नियम व अटींचा मजकूर सोबत जोडला आहे.

(शुभांगी शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: सहपत्र

प्रत-:प्रशासन ५-कार्यासन संग्रहार्थ.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : शानावि-१०२६/प्र.क्र.२३/प्रशासन-५
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३०

वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक-: २४ जुलै,२०२६.

## निविदा सूचना

अ.मु.स (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ या विभागातील शासकीय वाहन क्रमांक: **एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा)** या जुन्या वाहनाच्या विक्रीकरिता स्वतंत्र मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

२. सदर निविदा **दिनांक ३१ जुलै, २०२६** रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने मोहोरबंद पाकिटात पाठवाव्यात. विहित वेळेत प्राप्त निविदा **दिनांक ०३ ऑगस्ट, २०२६** रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास त्यांच्या एका अधिकृत प्रतिनिधीस उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार अ.मु.स (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचेकडे राखून ठेवले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

(शुभांगी शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-:प्रशासन ५-कार्यासन संग्रहार्थ.

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

क्रमांक : शावानि-१०२५/प्र.क्र.२३/प्रशा-५
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३०

वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक-: २४ जुलै, २०२६.

निविदा संदर्भात नियम व अटी.

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १. | मोहोरबंद पाकीटात निविदा समक्ष दिनांक : २७ जुलै,२०२६ ते ३१ जुलै,२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी अवर सचिव, प्रशासन-५, दालन क्रमांक ३२४ विस्तार, तिसरा मजला, वित्त विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ येथे सादर करावी. त्यावर वाहन क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) या जुन्या वाहनाच्या खरेदीसाठी निविदा असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २. | "जशी आहे तशा स्थितीत" विक्रीकरिता असलेले क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) हे जुने वाहन तपासणीसाठी मंत्रालयाच्या बाहेरील आवारात ठेवण्यात आले आहे. |
| ३. | ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ जुलै, २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. निविदेसोबत कोणतेही एक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. (आधार कार्ड/पॅन कार्ड) |
| ४. | वाहनासाठी इसाऱ्याची रक्कम रु.५०००/-(अक्षरी रुपये पाच हजार) अवर सचिव, रोखशाखा, वित्त विभाग, दालन क्रमांक ३२४ (विस्तार), तिसरा मजला, वित्त विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ यांच्याकडे रोखीने किंवा डी.डी.ओ., महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे नांवे इसीएस द्वारा **Bank Code : 001388, Bank Name: Bank of Maharashtra, Branch Name:** Mantralaya Branch, Mumbai-४०००३२, Account No.६०३५५६०७१५१, IFSC Code: MAHB०००१३८८ येथे जमा करावी. |